7.1.8 22-23

| Programmes conducted for creating an Inclusive Environment | | | |
|---|---|---|---|
| Name of the activity | Organizing unit/ agency/ collaborating agency | Date of the activity | Number of students participated in such activities |
| | **2022-2023** | | |
| | | | |
| Sadbhawana din | NSS | 20-08-2022 | 65 |
| Hindi Language day | Department of Hindi | 14-09-2022 | 60 |
| Samaj Din Rally | Cultural department | 4-02-2023 | 70 |
| Debate compitition | Cultural department | 01/02/2023 | 36 |
| Karmaveer Jayanti | Cultural department | 04-02-20223 | 35 |
| Marathi language day | Department of Marathi | 27-02-2023 | 55 |
| Dr.Babasaheb Ambedkar Jayanti | Cultural department | 14-03-2023 | 25 |


Principal
Karmveer Mamasaheb Jagdale
Mahavidhyalaya Washi Ta.Washi Dist.O,bad

**7.1.8**

**RESPOSE** - India is a nation which has Unity in Diversity. The college takes maximum efforts to make the students united in all aspects though they hail from different culture and practices. The day begins with the morning prayer for communal peace and harmony. The prayer refreshes minds of all faculty and students. No discrimination on the basis of gender, caste, language and religion. Special cells like SC/ST are formed to monitor the discrimination if any on the basis of caste. Scholarships facility is provided to the economically weaker section of the society. Value education, Gender studies and Environmental studies are offered as compulsory courses for all the undergraduate programs which inculcate values, gender sensitization and an eco friendly approach in the students. Committee Against Sexual Harassment (CASH) to record any grievance regarding Sexual Harassment Grievance Redressal Cell for taking steps to address the grievances of the students Secretary & Principal are accessible to students and they can directly contact them to redress their grievances. Mentor Mentee system (Student Adoption Programme) to provide additional care to students. Counseling given to students to overcome problems associated to age and gender. Students are motivated to participate in various social activities such as crowd, traffic control, Swatch Bharat, voter awareness etc. These programmes instill tolerance and help them to be molded into a responsible citizen. Avenues like Yoga club, Red Ribbon club, Youth Voluntary blood donors club, Gender club, Consumer club, Nature club, etc. creates a platform to work together and kindle their feelings of Love, Kindness & Compassion towards all living beings, animal life and plant life. The festival of Diwali is celebrated in the college. The students perform rural form of dances and are dressed traditionally. The celebration of such festivals instills culture among the students. To create patriotism and love towards our Nation, Republic Day and Independence Day are celebrated where in students are made to orate the life of freedom fighters to their fellow students.

**Principal**
Karmveer Mamasaheb Jagdale
Mahavidhyalaya Washi Ta.Washi Dist.O.bad

# वाशी येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा



पुण्य नगरी। वृत्तसेवा

वाशी : शहरातील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयामध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न झाला. यावेळी ग्रंथ प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमास प्राचार्य डॉ. रविंद्र कठारे, मराठी विभागप्रमुख प्रा. महेंद्रकुमार चंदनशिवे, प्रा. अशोक पाटील, प्रा. एम.डी. उंदरे, ग्रंथपाल प्रा. एम. डी टिपरसे व प्रा.बी.आर. घाटे यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ. रविंद्र कठारे म्हणाले, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. विविध संतांनी महान अशा मराठी साहित्याची निर्मिती केली आहे. भाषा संवर्धन करण्यामध्ये आपण कमी पडतो. भाषा व संस्कृतीचा परस्पर पूरक संबंध आहे. ग्रंथालयामधील विविध दर्जेदार ग्रंथाचा सदुपयोग करून प्राध्यापक व विद्यार्थांनी दैनंदिन जीवनामध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर करावा असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ए. एस. पाटील, सूत्रसंचालन प्रा. महादेव उंदरे यांनी तर आभार ग्रंथपाल महादेव टिपरसे यांनी मानले. कार्यक्रमास प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.राजेश उंदरे, विपुल भालेराव व एम. डी. कोळी यांनी परिश्रम घेतले.

6/27/24, 11:21 AM

22-23 — 7.1.8

दैनिक संघर्ष
गुरूवार दि. ०२/०२/२०२३

# मामासाहेब जगदाळे निमित्त व्याख्यान

बार्शी दि. १(प्रतिनिधी) बार्शी-कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या १२० व्या जयंतीनिमित्त कर्मवीर डॉ मामासाहेब जगदाळे जीवन व कार्य या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. प्रमुख वक्ते म्हणून प्रा.एम.ए चंदनशिवे व प्रा.ए.सी पाटील तर अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ.आर.व्ही कठारे उपस्थित होते.या वेळी बोलताना प्रा.चंदनशिवे म्हणाले कि,डॉ. जगदाळे मामा हे एक बहुआयामी व्यक्तिमत्व होते त्यांनी शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक आरोग्य आणि कृषी या क्षेत्रामध्ये मोलाचे काम केले आहे. महाराष्ट्र घडवण्यासाठी ज्या थोर महापुरुषांची परंपरा आहे त्या परंपरेचे पाईक म्हणून डॉ जगदाळे मामा कडे पहिले जाते. छत्रपती शिवाजी महाराज संत तुकाराम संत ज्ञानेश्वर संत गोरोबा काका व इतर संत हि मामाची मूळ प्रेरणा तळागाळातील व्यक्ती चा सामाजिक स्तर उंचावण्यासाठी तसेच वंचितांच्या दारी शिक्षणाची गंगा नेहून अज्ञान रुपी अंधार दूर करण्याचे काम मामानी केले. वसतिगृहामध्ये स्वावलंबन अंधश्रद्धा निर्मूलन व राष्ट्र भक्ती चे धडे विद्यार्थांना त्यांनी दिले.



या प्रसंगी बोलताना प्रा.ए.सी पाटील म्हणाले कि, डॉ जगदाळे मामा यांनी वंचित मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी म्हणून बार्शी येथे शिवाजी मराठा बोर्डिंग ची स्थापना केली. या इवलुशा रोपट्याचे आज श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी च्या रूपाने वटवृक्षामध्ये रूपांतर झाले आहे. मामांनी शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक व सांस्कृतिक क्रांती केली आहे.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ रविंद्र कठारे म्हणाले कि, मामाचे संपूर्ण जीवन तेजोमय आहे शिक्षण आणि समाजसेवा या विषयीचे मामाचे विचार पुढील पिढी पर्यंत पोहचवण्याचे काम आपण केले पाहिजे जी व्यक्ती समाजामध्ये विविध क्षेत्रामध्ये महान काम करते तीच खऱ्या अर्थाने कर्मवीर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ आनंद करडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.एम.डी उंदरे यांनी केले तर आभार प्रा.आर. आर जाधव यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक प्राध्यापिका विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिक्षणमहर्षी डॉ

https://drive.google.com/drive/folders/1dAS4KDA_R99tKpNtFMEjoXrqMd0zou-x

7.1.8

# वाशी येथे कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात मराठी भाषा दिन साजरा



वाशी, दि.२७ (प्रतिनिधी)–ज्या ज्ञानेश्वर महाराज आणि मराठवाड्यातील संतांच्या संस्कारांनी साऱ्या विश्वाला कवेत घेण्याचं स्वप्न पाहिलं अशी व्यापक कल्पना मराठी भाषेतून ज्ञानेश्वरांनी माडली त्याच महाराष्ट्रात वृद्धाश्रमाची संख्या वाढली हे महाराष्ट्राला भूषणावह नाही अशी खंत प्रा.अशोक पाटील यांनी वाशी येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयमध्ये मराठी राजभाषा दिनानिमित व्यक्त केली.

वाशी येथे कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात मराठी भाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. २७ फेब्रुवारी हा दिवस म्हणजे प्रसिद्ध ज्येष्ठ लेखक,कवी,कादबरीकार विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस. कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी त्यांना आदरांजली अर्पण करण्यासाठी दरवर्षी मराठी भाषा दिन म्हणजेच मराठी राजभाषा दिवस साजरा केला जातो.कुसुमाग्रज यांची जयंती तसेच मराठी राज्यभाषा दिवस याचे औचित्य साधून महाविद्यालयात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे प्र[illegible] पाहुणे म्हणून श्री.पाटील बोलत होते. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविंद्र कठारे होते. प्रा.अशोक पाटील यांनी सांगितले कि, महाराष्ट्र सारख्या अतिशय संस्कारशील राज्यात वृद्धाश्रम वाढतायत हे समाजाच्या अनारोग्याचे लक्षण आहे. आपल्या मागील पिढ्यानी जनावरे जितकी प्रेमाने साभाळली तितकी आपण घरातील माणस सांभाळायला तयार नाहीत आणि वृध्दाश्रम ची वाढत चाललेली संख्या हे महाराष्ट्राला भूषणावह नाही. ज्ञानेश्वर महाराजांनी आणि मराठवाड्यातील संतांच्या संस्कारांनी साऱ्या विश्वाला कवेत घेण्याचं स्वप्न पाहिल अशी व्यापक कल्पना मराठी भाषेमधून ज्ञानेश्वरांनी मांडली तिथेच वृद्धाश्रम वाढली हि किती खंत करणारी गोष्ट आहे. आपण भाषेपासून तुटत चाललो आहोत हा त्याचाच परिणाम आहे. पुढे बोलताना त्यांनी सांगितले कि, मराठी भाषेचा उदय संस्कृतचा प्रभावाखाली निर्माण झालेल्या प्राकृत भाषेचा 'महाराष्ट्री' या बोलीभाषेपासून झाला, असे मानले जाते की, पैठण (प्रतिष्ठान) येथील सातवाहन साम्राज्याने प्रशासनात महाराष्ट्री भाषेचा वापर सर्वप्रथम केला. देवगिरीच्या यादवांच्या काळात मराठी भाषेची भरभराट झाली. मराठी ही भाषा देवनागरी लिपी मधुन लिहिली जाते. इ.स. १२७८ मध्ये म्हाइंभट यांनी लीळा चरित्र लिहिले. त्यानंतर इ.स. १२९० मध्ये ज्ञानेश्वरी या ग्रंथाची रचना ज्ञानेश्वरांनी केली. महानुभाव संप्रदायाने मराठी साहित्यात मोलाची भर घातली. संत एकनाथ यांनी या भाषेत भारुडे लिहिली आणि एकनाथी भागवत, भावार्थ रामायण आदि ग्रंथांची भर घातली. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी साम्राज्याची मुहूर्तमेढ रोवली आणि पेशव्यानी या साम्राज्याचा विस्तार केला. त्यानंतर मराठी भाषेस राजाश्रय मिळाला. इ.स. १९४७ नंतर स्वतंत्र भारत देशाने मराठीला अधिकृत राज्यभाषेचा दर्जा दिला. इ.स. १९६० मध्ये मराठी भाषिकांच्या महाराष्ट्र राज्यास मान्यता मिळाली आणि मराठीस राजभाषेचा मुकुट प्राप्त झाला.असे त्यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रविंद्र कठारे यांनी सांगितले कि, मराठी किंवा इतर कुठलीही भाषेचा ह्रास होत असेल तर त्याला आपणच कारणीभूत आहोत. आपण जर मराठी भाषेचा वापर रोजच्या दैनंदिन जीवनात कमी केला म्हणूनच आज अट्टहासाने सांगावे लागते कि मराठी भाषेचे जतन करा.आज आपण आपआपसातील सोशल मीडिया मुळे संवाद कमी झाला आहे. अशी खंत यावेळी व्यक्त केली. मराठी भाषेला गौरवशाली संस्कृती आहे.त्याचबरोबर शासकीय व्यवहारात सोपे शब्द वापरण्याची, सोप्या भाषेतील शब्दकोश तयार करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.'नटसम्राट' या महान नाट्यकृतीसाठी कुसुमाग्रजांना साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे.

जाहिर प्रगटन

7.1.8

## कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी

अध्यक्षस्थानी प्राचार्य रवींद्र कठारे होते. प्रा. अशोक पाटील, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. आनंद करडे, प्रा. आर. आर. जाधव, प्रा. श्याम डोके, प्रा. एम. डी. उंदरे उपस्थित होते. प्रा. पाटील यांनी विचार व्यक्त केले. प्रा. डॉ. आनंद करडे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. ऊर्मिला नाईक यांनी सूत्रसंचालन केले. ग्रंथपाल महादेव टिपरसे यांनी आभार मानले.



वाशी : कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रा. डॉ. रवींद्र कठारे, प्रा. अशोक पाटील, प्रा. डॉ. आनंद करडे, प्रा. श्याम डोके, प्रा. आर. आर. जाधव, प्रा. एम. डी. उंदरे आदी.

7.1.8 225

# जगदाळे महाविद्यालयात डॉ. आंबेडकर यांच्यावर व्याख्यान

तभा वृत्तसेवा

**वाशी, दि.१४ मार्च -**

कर्मवीर मामासाहेब जगदाळे डॉ. म हाविद्यालय वाशी आणि विद्यार्थी विकास मंडळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला विषय : सर्वांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून डॉ. प्रल्हाद लुलेकर (जेष्ठ विचारवंत, छत्रपती संभाजीनगर) हे लाभले तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र कठारे हे होते. यावेळी माजी प्राचार्य डॉ. सूर्यकांत जगदाळे, प्रा.महेंद्र चंदनशिवे (संयोजक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला) यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख वक्ते मा.डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी सांगितले कि, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म नवाला एक चांगला माणूस म्हणून वागायला शिकवले आहे. डॉ. बाबासाहेबांना जेंव्हा संधी मिळाली तेंव्हा शेतीचे प्रश्न मांडले. त्यांनी सांगितले कि बाबासाहेबांनी महसूल व कर शेती उत्पन्नावर आधारित असावा. शेतकऱ्यांचा पहिला मोर्चा १९३८ ला डॉ. बाबासाहेबांनी शेतकऱ्यांचा लढ्यासाठी काढला. पुढे बोलताना त्यांनी सांगितले कि, जात धर्म विसरून सर्वांनी एकत्र आले तर शेतकऱ्यांचे प्रश्न सुटतील, असे ते म्हणाले.




प्राचार्य डॉ. रविंद्र कठारे म्हणाले कि, विद्यार्थ्यांच्या भावी जीवनासाठी आंबेडकरांचे जीवन हे संजीवनी होईल आणि उद्याचे जीवन सुखी होण्यासाठी संविधानाची आपण कास धरली पाहिजे असे विचार यावेळी मांडले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.महेंद्र चंदनशिवे यांनी केले सुत्रसंचलन प्रा. अशोक पाटील यांनी केले तर आभार प्रा. कुंडलिक गुंड यांनी मानले.

या कार्यक्रमाला प्राध्यापक वृंद कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

22-23 7.1.8

# वाशी येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात हिंदी दिवस समारोह साजरा

वाशी, दि.१४ (प्रतिनिधी) - कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे आज दि.१४सप्टेंबर रोजी हिंदी दिवस समारोह कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ विजयकुमार भांजे तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ अरुण गंभीरे व प्रा.इम्रान शेख उपस्थित होते. या वेळी बोलताना हिंदी विभाग प्रमुख प्रा.डॉ अरुण गंभीरे म्हणाले की, हिंदी भाषा समाज जोडण्याचे काम करते राष्ट्रपिता महात्मा गांधी हे असे म्हणत की देशातील सर्व जाती धर्मांचे लोक एकसंघ ठेवण्यासाठी हिंदी भाषेची राष्ट्रभाषा म्हणून नितांत गरज आहे. यावेळी प्रा.डॉ अरुण गंभीरे यांनी देशातील शिक्षण व सामाजिक सलोखा ठेवण्यासाठी हिंदी चे महत्व सांगितले.



अध्यक्षीय समारोप करताना स्टाफ वेलफेयर समितीचे अध्यक्ष तथा इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ विजयकुमार भांजे म्हणाले, भारत व अनेक देशामध्ये हिंदी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो तसेच भारत व बहुतांश देशातील विद्यापीठात हिंदी विषयाचे अध्ययन, अध्यापन व संशोधन केले जात आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संचलन व आभार प्रदर्शन प्रा.इम्रान शेख यांनी केले. या वेळी प्राध्यापक वृंद विद्यार्थी विद्यार्थींनी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.अशोक पाटील , प्रा. शाम डोके, प्रा.एम डी उंदरे, प्रा.नितीन कोळेकर, प्रा.जयंत कवडे यांनी सहकार्य केले.

6/27/24, 11:15 AM

22-3 7.1.8

पुढारी

संक्षिप्त




# अब्दुल कलाम यांची जयंती साजरी

वाशी :कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी येथे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती हि वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. रविंद्र कठारे अध्यक्षस्थानी होते. प्रमुख पाहुणे म्हणून वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा.शामसुंदर डोके, ग्रंथपाल एम. डी. टिपरसे उपस्थित होते. प्रा. डोके म्हणाले कि, डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम हे तरुणाचे प्रेरणा स्थान असून त्यांनी अग्निपंख सारख्या ग्रंथाचे लिखाण करून युवकांना प्रेरणा देण्याचे काम केले. प्राचार्य डॉ.कठारे म्हणाले कि , कोणतेही काम काम करताना काही तरी ध्येय समोर ठेवले पाहिजे तुमच्या समोर अनेक आव्हाने आहेत त्याला सामोरे जाण्यासाठी वाचन करणे महत्वाचे आहे. सूत्रसंचालन प्रा. महादेव उंदरे यांनी केले. प्रा. बी. आर सूर्यवंशी यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. आनंद करडे, प्रा. डॉ बालाजी देवकते, प्रा. कुंडलिक गुंड, प्रा. डॉ. दैवशाला रसाळ, प्रा .सुनिता डोके, प्रा. आर. एस. वासकर, प्रा. शालन जगताप, प्रा. डॉ अनंत पाटील, विपुल भालेराव आदींनी पुढाकार घेतला.

https://drive.google.com/drive/folders/1dAS4KDA_R99tKpNtFMEjoXrqMd0zou-x